प्रेस नोट

युनिटचे नाव	लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलढाणा
आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय	आलोसे श्रीमती पुनम श्रीकृष्ण थोरात, वय ३४ वर्ष, पद– पुरवठा निरीक्षण अधिकारी, वर्ग–२, तहसिल कार्यालय, नांदुरा रा.माऊली नगर, पाचपोर यांचे घरी किरायाने नांदुरा ता.नांदुरा जि.बुलढाणा.
लाच मागणी	१६,०००/– रुपये
लाच स्विकारली	१६,०००/– रुपये
घटनास्थळ	नांदुरा तहसिल कार्यालयातील पुरवठा निरीक्षण अधिकारी यांचे दालनामध्ये
घटना तारीख	१४.११.२०२५

थोडक्यात हकीकत :–यातील तक्रारदार यांचे चुलते यांच्या नावावर स्वस्त धान्य दुकान असून ते स्वस्त धान्य दुकान तक्रारदार हेच चालवितात. सदर स्वस्त धान्य दुकानाची दि.२९.१०.२०२५ रोजी तपासणी पुरवठा अधिकारी नांदुरा यांनी केली होती. नमुद तपासणी अहवालात काही त्रृटी न दाखविता सदरचा अहवाल तक्रारदार यांचे बाजूने जिल्हा पुरवठा अधिकारी,बुलढाणा यांचेकडे पाठविण्यासाठी तसेच स्वस्त धान्य दुकानात धान्य पुरवठा सुरळीत चालू ठेवण्यासाठी लोकसेवक श्रीमती पुनम थोरात पद–पुरवठा निरीक्षण अधिकारी, नादुंरा हया १६,०००/– रूपये लाचेची मागणी करीत असल्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बुलडाणा घटकाकडे प्राप्त झाली होती.

त्यानुसार आज दिनांक १४.११.२०२५ रोजी प्राप्त तक्रारीनुसार आयोजीत पडताळणी कार्यवाही दरम्यान लोकसेवक श्रीमती पुनम थोरात पद–पुरवठा निरीक्षण अधिकारी, नादुंरा यांनी तक्रारदार यांचेकडे तक्रारदार चालवित असलेल्या स्वस्त धान्य दुकानाचा तपासणी अहवालात काही त्रृटी न दाखविता तक्रारदार यांचे बाजुने त्यांचे वरिष्ठ कार्यालयात अहवाल पाठविण्यासाठी व त्यांचे दुकानाचा स्वस्त धान्य पुरवठा सुरळीत चालू ठेवण्यासाठी १६,०००/– रूपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम आजच घेवुन येण्यास सांगीतले. त्यानुसार आजरोजी तहसिल कार्यालय, नांदुरा येथे आयोजीत सापळा कार्यवाही दरम्यान नांदुरा तहसिल कार्यालयामधील पुरवठा निरीक्षण अधिकारी यांचे दालनामध्ये तक्रारदार यांचेकडून १६,०००/– रूपये लाचेची रक्कम स्विकारतांना आलोसे श्रीमती पुनम थोरात, पुरवठा निरीक्षण अधिकारी यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यावरुन आलोसे श्रीमती पुनम थोरात यांचेविरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

सदर कार्यवाही :–

१.मा.श्री.बापू बांगर, पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९०११३२३४२६

२.मा.श्री. सचिंद्र शिंदे,अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,अमरावती,परिक्षेत्र अमरावती.
मों.नं.९७६४२१०४८५

३.मा.श्री.भागोजी चोरमले, पोलीस उपअधिक्षक,ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलढाणा.
मों.नं.९५५२५२०१८८

यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.रमेश पवार,पोलीस निरीक्षक व पोहेकॉ प्रविण बैरागी,, अमोल झिने, पोना जगदीश पवार, पोकॉ रंजीत व्यवहारे, मपोकॉ स्वाती वाणी, चापोहेका नितीन शेटे, सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो, बुलडाणा यांनी पार पाडली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत ॲन्टी करप्शन ब्युरो बुलडाणा.येथे दुरध्वनी क्रमांक ०७२६२–२४२५४८ व व्हाटस अप क्रमांक ९४०५०९१०६४ तसेच टोल फ्रि क्रमांक १०६४ यावर संपर्क साधून तक्रार करण्याचे आवाहन पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो,बुलडाणा यांनी केले आहे.

(भागोजी चोरमले)
पोलीस उपअधिक्षक,
ॲन्टी करप्शन ब्यरो बुलडाणा.

पोलीस उप अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो * बुलढाणा * सत्यमेव जयते